**ठळक बातम्या**

- नवी मुंबई विमानतळावर ४ टर्मिनलची उभारणी होणार असून या विमानतळावरून वर्षाला ९ कोटी लोक प्रवास करतील अशी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची माहिती

- वर्ष २०१६ ते २०२२ या काळात ग्रामीण कुटुंबांचं सरासरी मासिक उत्पन्न ५७ टक्क्यांनी वाढल्याचा नाबार्डचा निष्कर्ष

- यंदाचा शांततेचा नोबेल पुरस्कार निहोन हिदानक्यो या जपानच्या संस्थेला जाहीर

**आणि**

- बेटींग घोटाळा आणि फसवणूक प्रकरणी महादेव बेटींग एपच्या सूत्रधाराला दुबईत अटक

**<><><><><>**

नवी मुंबई विमानतळावर ४ टर्मिनलची उभारणी होणार असून या विमानतळावरून वर्षाला ९ कोटी लोक प्रवास करतील, तसंच २६ लाख टन कार्गो वाहतूक होईल, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या हवाई पट्टीवर भारतीय हवाई दलाच्या C-295 विमानाचं यशस्वी चाचणी लँडिंग झाल्यानंतर प्रसार माध्यमांशी संवाद साधताना ते बोलत होते.

भारतीय विमानतळ प्राधिकरणाने विमानतळावरील इन्स्ट्रुमेंट लँडिंग सिस्टीमच्या चाचण्या पूर्ण केल्यानंतर आज धावपट्टीची चाचणी करण्यात आली. यावेळी केंद्रीय विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, सिडकोचे उपाध्यक्ष विजय सिंघल उपस्थित होते.

**<><><><><>**

लाओस इथला दोन दिवसीय दौरा आटोपून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी भारतात परत येण्यासाठी रवाना झाले आहेत. या दौऱ्यात त्यांनी एकोणिसाव्या पूर्व आशिया शिखर परिषदेला संबोधित केलं. हिंद-प्रशांत प्रदेशाच्या शांतता तसंच प्रगतीसाठी एक सर्वसमावेश, मुक्त, समृद्ध आणि शिस्तबद्ध वातावरण आवश्यक असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या परिषदेत केलं. जगाच्या विविध भागात सुरू असलेल्या संघर्षाचा ग्लोबल साउथ देशांवर होणाऱ्या परिणामांविषयीही त्यांनी चिंता व्यक्त केली. हे युग युद्धाचं युग नसून प्रत्येक समस्येचं निराकरण हे युद्धातून शक्य नाही. युरेशिया आणि पश्चिम आशिया प्रदेशात शांतता प्रस्थापित व्हावी अशी प्रत्येकाची इच्छा असल्याचंही प्रधानमंत्री यावेळी म्हणाले.

<><><><><>

आर्मी कमांडर कॉन्फरन्समध्ये सहभागी होण्यासाठी संरक्षण मंत्री राजनाथ सिंह सिक्कीमची राजधानी गंगटोक इथं दोन दिवसांच्या दौऱ्यावर जात आहेत. या परिषदेत धोरणात्मक बाबी आणि संरक्षण सिद्धतेवर चर्चा केली जाणार आहे. या दौऱ्यात संरक्षण मंत्री रस्ते प्रकल्प, प्रेरणा स्थळाचं उद्घाटन करतील. तसंच ऑक्टोबर २०२३ मध्ये हिमनदी सरोवर फुटून झालेल्या दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या २२ जवानांच्या स्मारकाचं अनावरणही करणार आहेत.

<><><><><>

वर्ष २०१६-१७ ते २०२१-२२ या आर्थिक वर्षात ग्रामीण कुटुंबांचं सरासरी मासिक उत्पन्न ५७ टक्क्यांनी वाढल्याचं नाबार्डच्या सर्वेक्षणात नमूद करण्यात आलं आहे. वर्ष २०१६-१७ मध्ये ग्रामीण कुटुंबांचं सरासरी मासिक उत्पन्न ८ हजार ५९ रुपये होतं; २०२१-२२ मध्ये ते १२ हजार ६९८ रुपयांपर्यंत वाढलं आहे. ग्रामीण भागातल्या कुटुंबांचा मासिक खर्चही ६ हजार ६०० रुपयांवरून ११ हजार २०० रुपयांवर गेला आहे; तसंच या कुटुंबांकडून होणारी आर्थिक बचतही वाढली आहे.

देशातल्या ग्रामीण कुटुंबांमध्ये विमा सुरक्षेतही लक्षणीय वाढ झाल्याचं या सर्वेक्षणात म्हटलं आहे. सर्वेक्षणाच्या आकडेवारीनुसार, किमान एक सदस्य विमा धारक असलेल्या कुटुंबांचं प्रमाण २५ टक्क्यांवरून ८० टक्क्यांच्या वर गेलं आहे. ग्रामीण भागात किसान क्रेडिट कार्ड महत्त्वाचं ठरत असून पेन्शन धारक कुटुंबांची संख्या १९ टक्क्यांवरून साडे तेवीस टक्के झाली आहे. दरम्यान, थकीत कर्ज असलेल्या कुटुंबांचं प्रमाणही वर्ष २०१६-१७ मधल्या ४७ टक्क्यांवरून २०२१-२२ मध्ये ५२ टक्क्यांपर्यंत वाढलं आहे**.**

**<><><><><>**

रत्नागिरी तालुक्यातल्या झाडगाव एमआयडीसी क्षेत्रात १९ हजार ५५० कोटी रुपयांची गुंतवणूक होणार असलेल्या वेल्लोर सेमीकंडक्टर प्रकल्पाचं भूमिपूजन आज पालकमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते झालं. कंपनीतर्फे रत्नागिरीतल्या दीड हजार युवकांना परदेशात प्रशिक्षण देऊन इथल्या प्रकल्पात नोकरी मिळणार आहे.

मुलांनी शिकून परदेशात नोकरी करावी, असं अनेकांचं स्वप्न असतं. ते स्वप्न या प्रकल्पामुळे रत्नागिरीतच पूर्ण होणार आहे, असं सामंत यांनी सांगितलं. या प्रकल्पातून मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. भविष्यात राज्यातल्या सर्वाधिक जीडीपीच्या पहिल्या पाचात रत्नागिरीचा समावेश असेल, असं प्रतिपादन व्हीआयटी सेमिकॉन्स पार्क प्रायव्हेट लिमिटेडचे संचालक ताजपूर संपथ कण्णन यांनी केलं.

**<><><><><>**

वर्ष २०२४ चा शांततेचा नोबेल पुरस्कार निहोन हिदानक्यो या जपानच्या संस्थेला आज जाहीर झाला. हिरोशिमा आणि नागासाकीवर झालेल्या अणुबॉम्ब पीडितांसाठी ही संस्था काम करते. जग अण्वस्त्रमुक्त करण्यासाठी आणि प्रत्यक्षदर्शींच्या कहाण्यांमधून अण्वस्त्रांचा वापर पुन्हा कधीही होऊ नये, यादृष्टीनं या

संस्थेनं केलेल्या प्रयत्नांचा सन्मान म्हणून यंदाचा नोबेल शांतता पुरस्कार या संस्थेला देत असल्यानं नॉर्वेजियन नोबेल समितीनं म्हटलं आहे.

**<><><><><>**

उद्योगपती रतन टाटा यांचे सावत्र बंधू नोएल टाटा यांची टाटा ट्रस्टच्या अध्यक्षपदी एकमतानं निवड झाली आहे. टाटा ट्रस्ट ही टाटा समूहाची सामाजिक क्षेत्रात कार्य करणारी शाखा आहे. ट्रस्टच्या संचालक मंडळाच्या बैठकीत आज हा निर्णय घेण्यात आला. नोएल टाटा सध्या टाटा स्टील आणि व्होल्टाससह इतरही कंपन्यांच्या संचालक मंडळाचे सदस्य आहेत.

**<><><><><>**

बेटींग घोटाळा आणि फसवणूक प्रकरणी महादेव बेटींग एपचा सूत्रधार सौरभ चंद्राकर याला दुबईमधे अटक झाली आहे. सक्तवसुली संचालनालयाने गेल्यावर्षी त्याच्यासाठी रेड कॉर्नर नोटीस जारी केली होती. त्याच्या हस्तांतरणाची प्रक्रीया सुरु झाली असून येत्या आठवडाभरात त्याला भारतात आणण्यात येईल असं सूत्रांनी सांगितलं.

**<><><><><>**

नाशिकच्या देवळाली कॅम्प इथं आर्टिलरी फिल्ड फायरिंग रेंजमध्ये तोफ चालवण्याचा सराव सुरू असताना तोफगोळ्याचा स्फोट होऊन दोन अग्निवीरांचा मृत्यू झाला आहे तर अन्य एक अग्निवीर जखमी झाला आहे. गोहिल विश्वराज सिंग आणि सैफत शित अशी या मृत झालेल्या अग्निवीरांची नावं आहेत. देवळाली कॅम्पमध्ये तोफेचा सराव सुरू असताना तोफेजवळच गोळ्याचा स्फोट झाला आणि त्याचे तुकडे अग्निवीरांच्या शरीरात घुसल्याने ते गंभीर जखमी झाले. त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं. तिथे उपचारांदरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

**<><><><><>**

नागपूरातील पवित्र दीक्षाभूमीवर आज दीक्षाभूमी स्मारक समितीचे सदस्य आणि समता सैनिक दल यांच्या उपस्थितीत भदंत आर्य नागार्जुन सुरई ससाई यांच्या नेतृत्वाखाली पंचशिल ध्वजारोहण करण्यात आलं. यावेळी समता सैनिक दलाचे जवान, बौद्ध अनुयायी उपस्थित होते. उद्या धम्मचक्र प्रवर्तन दिनाचा मुख्य सोहळा सायंकाळी साजरा केला जाणार असल्यानं दीक्षाभूमीवर आजपासूनच हजारों बौद्ध अनुयायी दाखल होऊ लागले आहेत.

**<><><><><>**

राज्यातले दुसरे सौरग्राम होण्याचा मान पुणे जिल्ह्यातल्या खेड तालुक्यातल्या टेकवडी गावानं पटकावला आहे. १ हजार २३९ लोकसंख्येच्या या गावातील सर्वच घरगुतीसह ७४ वीज जोडण्यांना सौर ऊर्जा प्रकल्पांतून वीजपुरवठा सुरु झाला आहे. महावितरणकडून राज्यातील १०० गावे १०० टक्के सौर ऊर्जेवर नेण्याची मोहीम सुरू असून त्यात टेकवडी गावाची निवड झाली होती. यात सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यातल्या मान्याची वाडीनं प्रथम क्रमांक मिळवला होता.

**<><><><><>**

पुण्यात कोरेगाव पार्क परिसरात काल रात्री एक कार मोटारसायकलवर आदळल्याने झालेल्या अपघातात मोटारसायकलस्वाराचा मृत्यू झाला. अपघातानंतर त्याला जवळच्या रुग्णालयात नेलं होतं, मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केलं. कारचालक घटनास्थळावरुन पळून गेला होता. त्याला सीसीटीव्ही चित्रिकरणाच्या आधारे पोलिसांनी हडपसर इथून पकडलं आहे.

**<><><><><>**

आज दुर्गा अष्टमी आहे. देशाच्या विविध भागांमध्ये, विशेषत: पूर्व भागात दुर्गापूजेचा उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. आजच्या दिवशी दुर्गा देवीच्या नऊ रूपांची पूजा केली जाते. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज दुर्गापूजेच्या निमित्तानं देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. दुर्गादेवी शक्तीचं प्रतीक आहे, वाईट

शक्तींवर चांगल्या शक्तींचा विजय म्हणून दुर्गापूजा साजरी केली जाते, असं राष्ट्रपती मुर्मू यांनी  समाजमाध्यमावरल्या आपल्या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

स्वातंत्र्यसैनिक, लोकनायक जयप्रकाश नारायण यांची जयंती आज देशाच्या विविध भागात साजरी होत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमावरल्या पोस्टद्वारे जयप्रकाश यांना अभिवादन केलं. जयप्रकाश नारायण यांनी समाज आणि देशासाठी दिलेल्या योगदानाची आठवण प्रधानमंत्र्यांनी केली. जयप्रकाश यांचे विचार अनेक पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरतील, असं प्रधानमंत्री म्हणाले.

**<><><><><>**

जगभरात आज आंतरराष्ट्रीय बालिका दिन साजरा करण्यात येत आहे. लिंगभाव समानता, लैंगिक शिक्षण आणि मुलींसाठी समान संधी यांचं महत्त्व अधोरेखित करणं हा या दिवसाचा उद्देश आहे.

**//<><><><><>//**